(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दुरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/

दिनांक : १० एप्रिल, २००७

**विषयः** दिनांक ३० मार्च, २००७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०७ व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक ३० मार्च, २००७ रोजी दुपारी २.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०७ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

संजय दहासहस्त्र
(डॉ. संजय दहासहस्त्र)
सदस्य सचिव

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता,
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :

B.M.-105/35

स.स.
संजय दहासहस्त्र

पापु - २८१
१०/४/०७

मु.प्र.अ.
१३/४

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/

दिनांक : १० एप्रिल, २००७

विषयः दिनांक ३० मार्च, २००७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०७ व्या सभेचे इतिवृत्त.

दिनांक ३० मार्च, २००७ रोजी दुपारी २.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०७ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

सं.व्यं.दहासहस्त्र
( डॉ. संजय दहासहस्त्र )
सदस्य सचिव

मा. मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता,
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :

B.M.-105/35

स.स.
सं.व्यं.दहासहस्त्र

पाpु. 289
10/4/07

मु.प्र.अ.
1314

(३)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०७ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०७ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० मार्च, २००७ दुपारी २.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा. श्री. रणजित कांबळे, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री. जो. म. फाटक, प्रधान सचिव, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री. सुनिल सोनी, (वित्तीय सुधारणा), प्रधान सचिव, वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६. श्री. कृष्णा एस. वत्स, सचिव, ग्राम विकास विभाग.
७. श्री. संजय दहासहस्त्र, प्रभारी सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे .
२. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागपूर.
३. श्री. व्ही. आर. कल्याणकर, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
५. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
६. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणेबाबत..**

दिनांक ३१ आक्टोबर, २००६ रोजी संपन्न झालेल्या १०६ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०६ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

मजीप्राच्या १०६ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत चर्चा करीत असताना मा. अध्यक्ष यांनी आयत्यावेळेचा विषय असलेल्या UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूरी मिळालेल्या व मंजूरीसाठी प्रस्तावित असलेल्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे मजीप्रास मिळणेबाबत केलेल्या कार्यवाहीची विचारणा केली. चर्चेअंती सदर बाबत मा. मुख्यमंत्री यांना सादर करावयाची प्रारुप टिप्पणी मजीप्राने शासनास सादर केली असून सदरचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्याबाबतचे निर्देश मा. अध्यक्ष, यांनी मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग (२) यांना दिले. सर्वसाधारण चर्चेनंतर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीत मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष यांनी, ज्या बॅकांमध्ये या गुंतवणूकी केल्या जातात त्या बॅकांच्या आर्थिक स्थितीबाबत खात्री करुन मगच गुंतवणुक करावी असे निर्देश दिले. तसेच विविध कालावधीसाठी गुंतवणूक प्रस्तावित करण्यापूर्वी कॅशफ्लो तयार करावा म्हणजे कोणत्या कालावधीसाठी किती निधी गुंतवणूक करणे योग्य होईल याची खात्री करावी. संचालक मंडळाच्या या सुचना असुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी असे मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी निर्देश दिले. सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस जोडलेल्या दिनांक २८.१०.२००६ ते ७.३.२००७ या कालावधीत, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणुकीसही मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळणेबाबत :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळणेबाबत सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत वि.स.व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळास अवगत केले. चर्चेदरम्यान मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांनी वार्षिक लेख्याच्या पृष्ठ क्र. ७ वरील वेतन व भत्ते अंतर्गत दिनांक ३१.३.२००६ अखेर झालेला रु. ९९.४९ लक्ष खर्चामध्ये मजीप्राच्या पाणी पुरवठा केंद्रावरील कर्मचाऱ्यांचा वेतन व भत्ते पोटी खर्चाचा समावेश असल्याची मत प्रदर्शित केले. यावर वि.स. व मु.ले.अ. यांनी पाणी पुरवठा केंद्राच्या कर्मचारी वर्गाचा वेतनावरील खर्च फक्त देखभाल व दुरूस्ती खर्चाअंतर्गत दर्शविला जाते असे नमूद केले. त्याचप्रमाणे सन २००४-०५ या निर्धारण वर्षाचे आयकर निर्धारण करण्यात आले असून आयकर काहीही नसल्याचे (निल निर्धारण) आदेश प्राप्त झाल्याचे संचालक मंडळास अवगत केले.

सदर चर्चे दरम्यान मा. उपाध्यक्ष तथा राज्य मंत्री, पा.पु. व स्व. यांनी कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाबद्दल विमा कंपनीकडे चौकशी करुन कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय विम्या बाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत संचालक मंडळासमोर सादर करण्याचे सूचीत केले.

अंतिमतः सादर केलेल्या या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २००७-०८ चा आढावा :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या दराचा सन २००७-०८ चा आढावा घेण्यात आला असून सन २००७-०८ साठी पाण्याचे दरात १५% वाढ करणे व सदरची वाढ दिनांक १.५.२००७ पासून लागू करणे प्रस्तावित असून सादर केलेल्या या बाबीस मान्यता प्रदान करण्याबाबत संचालक मंडळास मा. सदस्य सचिव यांनी अवगत केले.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्रासाठी जरी दरवाढ प्रस्तावित केली नसली तरी ५% दरवाढ करावी व इतर पाणी पुरवठा केंद्रांसाठी १५% ऐवजी १०% वाढ करण्याचे सर्वानुमते ठरले व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००६-०७ सुधारीत व २००७-०८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत :**

सदर कार्यक्रम बाबीबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. चर्चेअंती सन २००६-०७ चे सुधारीत अंदाज व सन २००७-०८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

दिवसेंदिवस कमी होत चाललेला कार्यभार विचारात घेऊन सदर चर्चे दरम्यान मजीप्रामध्ये १) सध्या प्रगतीपथावर असलेली कामे पूर्ण करण्यासाठी २) मजीप्रा राबवित असलेल्या योजनांची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठीचा व ३) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार विभाग, असे तीन विभाग पाडून मजीप्राचा कार्यभार चालविता येईल किंवा कसे याची पडताळणी करुन आवश्यक तो प्रस्ताव तयार करावा असे निर्देश मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : प्राधिकरणाकडे असलेला कार्यभार व त्या अनुषंगाने ई. ॲन्ड पी. ची मिळकत**
**प्राधिकरणाच्या वित्तीय परिस्थितीचा आढावा:**

सदर कार्यक्रम बाबीबाबत संयुक्तपणे सदस्य सचिव व वि.स. व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळास अवगत केले. सद्यस्थितीत आकारण्यात येत असलेल्या १७.५% ई.ॲन्ड पी. तुन मिळणाऱ्या उत्पन्नातून मजीप्रा खर्च भागवू शकत नाही व या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, निवृत्ती वेतन तसेच प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी कोणते पर्याय अवलंबिणे आवश्यक आहे याबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.८.२००६ रोजी संपन्न झालेल्या १०५ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र. ८ अन्वये सादर करुन मान्यतेअंती प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाबाबत शासनाकडून पुढील कार्यवाही प्रतिक्षीत असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : वाढीव देवळाली-प्रवरा पा.पु.यो., ता. राहुरी, जि. अहमदनगर. योजनेस कर्जापोटी इतर योजनेच्या स्त्रोतातून निधी वर्ग करुन देणेबाबत :**

वाढीव देवळाली-प्रवरा पाणी पुरवठा योजनेस यापुर्वी रु. १५० लक्ष पर्यायी कर्ज म.जी.प्रा.ने उपलब्ध करुन दिले आहे. यापैकी दिनांक २३.१.२००६ रोजी देय झालेला परतफेडीचा हप्ता नगरपालिकेने मजीप्रास दिला आहे. तथापि, यापुढील कोणताही हप्ता

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

भरलेला नसून शासन हमीची थकबाकीही भरलेली नाही. मात्र अजूनही रु. २१७ लक्ष अधीकच्या पर्यायी कर्जाची मागणी नगरपरिषदेने केली असून अशा परिस्थितीत पुनःश्च मागणी केलेले रु.२१७ लक्ष द्यावे किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यासाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात आल्याचे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर बाबीवर चर्चा झाली. चर्चे दरम्यान सदर नगरपालिकेस संत गाडगेबाब स्वच्छता अभियानांतर्गत बक्षीस मिळाले असून सदर बक्षीसापोटीची रक्कम मजीप्राच्या प्रलंबित थकबाकीपोटी प्राप्त करुन देण्याच्यां अटीवर प्रस्तावित कर्ज देण्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : चाकण इंडस्ट्रीयल असोसिएशन व अन्य एकोणीस गावांसाठी नळ पाणी पुरवठा योजना, ता. खेड, जि. पुणे. म.जी.प्रा.ची योजना म्हणून राबविण्याबाबत व त्यात म.जी.प्रा.ने गुंतवणूक करण्याबाबत :**

चाकण इंडस्ट्रीयल असोसिएशन व अन्य एकोणीस गावांसाठी नळ पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.ची म्हणून राबविण्याबाबत व त्यांत म.जी.प्रा.ने गुंतवणूक करण्याबाबतच्या सादर केलेल्या कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन सदरचा प्रस्ताव आर्थिकदृष्टया मजीप्रास किफायतशीर होणार असल्याने संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१०: संशोधन व विकास कार्यक्रमांतर्गत म.जी.प्रा.ने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल :**

मजीप्राच्या १०५ व्या बैठकीत राज्यातील पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांच्या बाबतीत मजीप्राकडून संशोधन व विकास कार्यक्रम हाती घेण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले होते. या अनुषंगाने सद्यःस्थितीत मजीप्राकडून करण्यात आलेल्या व येत असलेल्या कार्यवाही बाबतची सदरची कार्यक्रम बाब अवलोकनार्थ सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे नाशिक प्रशिक्षण केंद्राची ठाणे व नागपूर येथे उपकेंद्रे स्थापन करण्यासाठी आवश्यक बाबींचा समावेश असलेल्या रु.१४६.८१ लक्ष किमतीच्या प्रस्तावास संचालक मंडळाची मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्तावित असल्याचे नमूद केले. सर्वकष चर्चा होऊन या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आली व

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

यासाठीची तरतूद सन २००७-०८ च्या अंदाजपत्रकात करुन बाब निहाय प्रस्तावास शासनाची मंजूरी घेण्याचे ठरले व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले. संशोधन व विकास कार्यक्रमांतर्गत आय.आय.टी., पवई मार्फत तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी रु. ४.८० लक्ष (कर वगळता) एवढी दरवर्षी रिटेनरशीप मागितलेली आहे. त्यानुसार आय.आय.टी.ला दरवर्षी रु. ४.८० लक्ष एवढी रिटेनरशीप देण्याच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आली.

सदर चर्चे दरम्यान, संशोधन व विकास कार्यक्रमांतर्गत, मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी त्यांच्या कार्य क्षेत्रातील कराड तालुक्यातील मलकापूर पाणी पुरवठा योजनेंर्गत कार्यरत असलेली पंपिंग मशिनरी GSM Mobile Technology वर आधारीत Robot, Remote Pump Controller उपकरणाने सदर बैठक चालू असलेल्या समिती कक्षातून Lap-Top वर SMS करुन प्रत्यक्षात चालू व बंद करून दाखविली. सदरच्या प्रात्यक्षिकास संचालक मंडळाने उत्स्फूर्तपणे दाद दिली.

**कार्यक्रम बाब क्र. ११: म.जी.प्रा.च्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करणे :**

मजीप्राच्या निविदा समितीने घेतलेल्या ४७ ते ५३ व्या निविदा समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर व त्यानुसार मजीप्रामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीवर संचालक मंडळाचे शिक्कमोर्तब करण्यासाठी सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात आल्याचे मा. सदस्य सचिव यांनी अवगत केले. सदर बाबीस संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र : १ :**

**२४ x ७ संकल्पनेनुसार पाण्याची तूट कमी करण्यासाठी कुळगांव-बदलापूर शहरातील अस्तित्वातील ए.सी. व पी.व्ही.सी. जलवाहिन्या एच.डी.पी.ई. पाईप्सव्दारे बदलण्याबाबत..**

कुळगाव-बदलापूर शहरामध्ये २४ x ७ संकल्पनेनुसार पाणी पुरवठा करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत असलेल्या पाण्याच्या त्रुटीचे प्रमाण कमी करणे आवश्यक असून त्यासाठी शहरातील अस्तित्वातील ७० वर्ष जुन्या असलेल्या ए.सी. व पी.व्ही.सी. जलवाहिन्या एच.डी.पी.ई. पाईप्सव्दारे बदलण्याबाबतचा प्रस्ताव Deferred Payment नुसार प्रस्तावित असून असून कार्यक्रम बाबीव्दारे प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात येत असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी अवगत केले. चर्चेदरम्यान Deferred

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

Payment तत्वावर किती रक्कम अदा करावी लागेल व upfront payment केल्यास किती रक्कम अदा करावी लागेल याचा अभ्यास करुन आर्थिकदृष्टया किफायतशिर प्रस्तावाचा विचार करण्यात यावा असे निर्देश मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी दिले. चर्चेअंती सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळेची चर्चा : वसई-विरार पाणी पुरवठा योजना, टप्पा-२ - ६९ गावांना पाणी पुरवठा करण्यासाठीच्या योजने संदर्भात सदर योजना मजीप्राने देखभाल व दुरुस्तीसह राबविणेबाबत :**

सदर बैठकी दरम्यान वसई-विरार पाणी पुरवठा योजना, टप्पा-२, ६९ गावांना पाणी पुरवठा करावयाची योजना मजीप्राने १०% लोकवर्गणी स्वतः उभारुन योजना पूर्ण करावी व मजीप्राची योजना म्हणून देखभाल व दुरूस्तीसह राबवावी असे निर्देश मा.अध्यक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिले. या योजनेमध्ये ६९ गावे असली तरी ती येत्या दोन वर्षात नागरी पाणी पुरवठयाच्या निकषात येणार असून या गावांनांही ७० लिटर्स दराने पाणी पुरवठा योजना राबविणे आवश्यक आहे अशी चर्चा करण्यात आली. मा. प्रधान सचिव, पापुवस्ववि, यांनी ६९ पैकी २५ गावांना सदरची गावे शहरापासून दूर असल्याने ४० लिटर्स दराने व उर्वरित सर्व गावांना ७० लिटर्स दराने पाणी पुरवठा प्रस्तावित करावा असे सांगितले.

चर्चे अखेरीस सदरची योजना मजीप्राने तयार करुन शासनास मंजूरीसाठी सादर करावी व वरिलप्रमाणे राबवावी असे संचालक मंडळाने निर्देश दिले. सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषित केले.

Board 100 Minutes/107 Minutes/91

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.